





## National Reading & Inspirational Day 2017-18



सकाळ – १६/१०/१७

# महात्मा गांधी महाविद्यालयात वाचनप्रेरणादिन

**आरमोरी, ता. १३ :** महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. प. वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने वाचन प्रेरणादिन नुकताच पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा होते. तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. गंगाधर जुआरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. खालसा म्हणाले की, मनुष्याच्या जीवनात वाचनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा खऱ्या अर्थाने विकास होतो. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांनी आधुनिक भारताचे स्वप्न रंगविताना युवकांना केंद्रस्थानी मानले होते. त्यांचे कार्य राष्ट्रविकासासाठी प्रेरणादायी आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनापासून प्रेरणा घ्यावी, असेही ते म्हणाले. यावेळी इतर मान्यवरांनीही समयोचित विचार व्यक्त केले. संचालन प्रा. डॉ. विजय रेवतकर यांनी केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागाचे सदस्य प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रशांत दडमल, किशोर कुथे आदींनी सहकार्य केले.

**आरमोरी : कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा व मंचावर उपस्थित मान्यवर.**

देशोन्नती - १८/१०/१७

# एपीजे अब्दुल कलाम यांचे कार्य राष्ट्रविकासास प्रेरणा देणारे

## ◆प्राचार्य लालसिंग खालसा यांचे प्रतिपादन



*तालुका प्रतिनिधी/१३ ऑक्टोंबर*

**आरमोरी :** मनुष्याचा जीवनात वाचनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होतो. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आधुनिक भारताचे स्वप्न रंगविताना युवकांना केंद्रस्थानी मानले होते. त्यांचे कार्य राष्ट्रविकासासाठी प्रेरणादायी आहेत. ज्या देशाची युवापिढी सुसंस्कृत, सुशिक्षित व चारित्र्यसंपन्न असेल तोच देश जगाची महासत्ता होऊ शकेल असा आशावाद डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी जोपासला होता. डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातुन फार मोठी प्रेरणा विद्यार्थ्यांना व युवकांना मिळु शकते. स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्याच्या दृष्टीने वाचनाची सवय लावावी आणि उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी केले.

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरीच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. याप्रसंगी प्रभारी प्रायार्च डॉ. राजेंद्र घोनमोडे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. गंगाधर जुआरे व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांनी महापुरूषांच्या जीवनावरील पुस्तकांचे अखंड वाचन करुन वाचन प्रेरणा दिनामित्ताने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले. यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाचे सदस्य प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रशांत दडमल, किशोर कुथे यांनी सहकार्य केले. यावेळी विद्यार्थी तसेच प्राध्यापकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.